# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्य संपदेला मराठीचे कोंदण

**प्रा.गुंडोपंत पाटील,** न्यू कॉलेज,कोल्हापूर patilgrnewcollege@gmail.com

---

प्रास्ताविक :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही एक जागतिक पटलावरील विचारधारा आहे. सामाजिक, राजकीय, वाड्.मयीन क्रांतिची बीज त्यामध्ये सामावलेले आहे.अभिमान वाटावा आणि स्वाभिमान जागावा, बंधमुक्त जगणे सुकर व्हावे. प्रत्येकजण सन्मान, समान हक्क आणि प्रेमबंधाने बांधला जावा अशा व्यापक विचारधारेचा आंबेडकरवाद हा फक्त महाराष्ट्र, मराठी पुरता मर्यादित नाही.तमाम भारतीयांच्या आणि विश्व कल्याणाचा, शांतीचा विचार आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे विश्वजीवनाचे तत्त्वज्ञानी *Universal Philosopher* आहेत. आंबेडकरवाद हे एक आधुनिक भारताचे तत्वज्ञान आहे. स्वातंत्र, समता, बंधुता व सामाजिक न्यायावर अधिष्ठित आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्रष्टया पुरोगामी तत्वज्ञानाने आणि प्रागतिक समाजकार्य तसेच क्रांतिकारी नवविचारांनी भारतीय समाज जीवनांत अपूर्व क्रांती घडवून आणली आहे. भारताच्या इतिहासाला नवे परिमाण लाभले.समाजजीवनाला नवी दिशा प्राप्त झाली आहे. बाबासाहेबांच्या विचार कार्याच्या क्रांतिकारी प्रेरणेमुळेच भारतीय साहित्यात विद्रोहाची मोठी लाट निर्माण झाली हे वास्तव आहे. त्याचे लोण आता जागतिक साहित्यापर्यंत पसरलेले आहे. आता जगालाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची प्रस्तुतता वाटत आहे.

आंबेडकरवादी साहित्य ही एक युगप्रर्वतक संकल्पना आहे. क्रांती, विद्रोह, समता, न्याय आणि विज्ञान या भौतिक विचारांशी जुळणारी ही एक आदश संकल्पना मानली जाते. कोणत्याही साहित्याचा पाया ऊर्जाशील विचार आणि नेतृत्वांवर आधारित असेल तरच ते साहित्य काळाच्या कसोटीवर टिकून राहते. त्याला उच्चदर्जाची चिरंतन मूल्ये प्राप्त होतात.मराठी दलित साहित्याची मुख्य प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत.त्यांचे तेजस्वी विचार,पुरोगामी बुध्दिप्रामाण्यवाद, समाजक्रांतिकारत्व, कला रसिकत्व व्यक्तिमत्व होते.असे आदर्ष व्यक्ती, विचारांचे समाजकार्य तसेच जीवनवादी साहित्य चळवळीचे केंद्र बनते आणि ते नेहमी समाजाला दिशादर्शक ठरत राहते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान वैश्विक होते.गुलामगिरीतुन बाहेर काढून नवी समताधिष्ठित समाज निर्मिती करणारे आंबेडकरवादी विचार बुध्दाच्या 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्वज्ञानांशी जुळणारा आहे.

डॉ.बाबासाहेब एक शुध्द कलावादी कलाप्रेमी तसेच कलावादी सौंदर्यसमीक्षक दृष्टी असलेले व्यक्तिमत्व होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक अस्सल ग्रंथ प्रेमी होते.ग्रंथ रसिक व्यक्तिमत्व होते.त्यांनी ग्रंथासाठी राजगृह बांधले होते.त्यांचे पुस्तकांचे घर होते.वेद, उपनिषदे, पुराणे, महाकाव्य, संत साहित्य, बौध्द साहित्य आणि लोकसाहित्य, मध्ययुगीन साहित्य, संस्कृत व इंग्रजी साहित्य स्वरूप तसेच अर्थशास्त्र,राज्यशास्त्र,समाजशास्त्र,तत्वज्ञान यासारख्या सामाजिकशास्त्रे बाबासाहेब आंबेडकर यांचे चिंतन आणि आवडीचे विषय होती. आयुष्यभर समाजहिताचा व देशहिताचा सातत्याने ध्यास घेत असले तरी त्यांची कलास्वाद, साहित्य स्वादाची जिज्ञासा, उत्सुकता कायम होती. अंतः करणामध्ये साहित्य कलेची आस्वादकता, रसिकता, सौंदर्योपासना, सौंदर्यदृष्टी होती.

नाटक, तमाषा, चित्रपट, संगीत या कलांची विशेष आवड होती. बाबुराव कवठेकरांचा तमाशाचे ते रसिक होते. कलावंत आणि कला ही उपेक्षित राहू नये अषी त्यांची धारणा होती. बाबासाहेबांना संगीत व नाटय कलेची आवड होती. बोलपट पाहण्यात विशेषरूची होती. आई रमाबाईसोबत 'अछूत कन्या','अंकल टौम','महात्मा फुले' सारखे चित्रपट त्यांनी पाहिले होते.'चलो कबीरा तेरा भवसागर डेरा' हे त्यांच्या आवडीचे पद होते.जीवनाच्या अखेरीस त्यांनी व्हायोलीन वाजविण्याची कला आत्मसात केली. उदास प्रसंगी तल्लीनतेने व्हायोलीन वाजवित असतं. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक आणि सामाजिक क्रांतिचा भारतीय समाजजीवन, साहित्य, कला, संस्कृतीवर मोठा प्रभाव पडलेला आहे. साहित्यांबरोबर जलसा, गाणी, नाटय, स्त्रीगीते, ओव्या इत्यादि मौखिक साहित्या मध्ये बाबासाहेबांचे विचार शब्दबध्द झाले आहेत. विशेषतः आंबेडकरी जलसा व वामनदादा कर्डकांची गीते अधिक लोकप्रिय झाली आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संत साहित्याचे अभ्यासक होते. आपल्या लेखन, भाषणांत अभंगात संताच्या विचारांचा अतिशय समर्पकपणे वापर केला आहे. 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रांच्या शीर्षस्थानी संत तुकारामांचा अभंग आणि ज्ञानेश्वरीतील ओव्या आहेत. अग्रलेखाच्या शीर्षकामध्ये '' महापुरे झाडे जाती ! तेथे लव्हाळे वाचती ! तसेच विष्णुमय जग ! वैष्णवांचा धर्म ! भेदाभेद भ्रम ! अमंगळ '' सारख्या संत कवींच्या वचनांचा उपयोग त्यांनी केला आहे. परिवर्तनाच्या चळवळीचा विचार लोकभाषेतुन लोकांपर्यंत पोहचावा यासाठी सुप्रसिध्द संत वचने प्रभावी ठरतात. याची त्यांना जाणीव होती.त्यांच्या लेखनात संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा, नामदेव, सोपानदेव, निवृत्तीनाथ, मुक्ताबाई, रोहिदास या संतांच्या ओव्या, अभंगाचे संदर्भ येतात. आंबेडकरांचे मराठी संत साहित्य आणि संताच्या लोकभाषा प्रेम होते. परंतु संतानी चातुर्वण्र्य व्यवस्थेविरूध्द जातीयता निर्मूलनाचे काम केले नाही.अशी त्यांनी परखड टीकाही संताच्यावर केली आहे.चातुर्वर्ण्य व्यवस्थेला विरोध करणेबाबत संत वाड्.मय अपयशी ठरले आहे.याची खंत आंबेडकरांनी व्यक्त केली आहे.आंबेडकरांचे वडिल रामजी आंबेडकर हे कबीरपंथी होते. त्यामुळे संत साहित्याचा बाबासाहेबांच्या बालमनांवर परिणाम झाला होता.संत तुकाराम, मुक्तेश्वर यांची संत वचने त्यांना चांगली अवगत होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठी साहित्याचे व्यासंगी अभ्यासक, रसिक तसेच मराठी भाषाप्रेमी व्यक्तिमत्व होते. हरिभाऊ आपटे, महात्मा फुले, गो.ग.आगरकर, लोकमान्य टिळक, राम गणेष गडकरी, लोकहितवादी या सुधारकांचे साहित्य त्यांनी मनापासून वाचले होते. 'किंगलियर' या नाटकावरून 'शहाणी मुलगी' हे नाटक स्वतः लिहून त्याचा प्रयोग महाविद्यालयीन शिक्षण घेताना डॉ.बाबासाहेब आंबेडरांनी केला. प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'खरा ब्राहमण' या नाटकाची त्यांनी लिहिलेली समीक्षा समाजशास्त्रीय समीक्षेचा उत्कृष्ठ नमुना आहे. विचारसौंदर्य हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनाचे प्राणतत्व आहे.तथापि संघर्षमय व्यस्त समाजकार्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना स्वतंत्रपणे अधिक प्रमाणी साहित्य चिंतन आपल्या लेखनामधून करता आले नाही.परंतु त्यांच्या साहित्य विषयक विचारसौंदर्य त्यांच्या लेखन,भाषणांतून वेळोवेळी प्रकट झाले आहे.संत साहित्याच्या मर्यादा आणि आधुनिक मराठी साहित्याकडून त्यांनी केलेल्या अपेक्षांची समीक्षात्मक मांडणी उद्बोधक आणि प्रत्यकारी आहे.

आंबेडकरवाद हे एक आधुनिक भारताचे तत्वज्ञान आहे. स्वातंत्र, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही विचारधारा अधिष्ठित आहे.व्यक्ती व समाजजीवन सामाजिक पातळीवर उपेक्षित, वंचित, बहिष्कृत समाज घटकांना नवे क्षितिज गवसले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर या व्यक्ती विचारांनी, चळवळी उभ्या केल्या. त्यांनी भारतीय समाजजीवनात क्रांती घडवून आणली.त्यांच्या प्रभावशाली विचाराने साहित्य कलाही दूर राहिली नाही.विचारसौंदर्याने साहित्याला झळाळी आली.मराठी साहित्य संपदेला कोंदण मिळाले. जीवघेणा अमानवी जीवनानुभव शब्दबध्द झाला.नवोदित लेखक अक्षरयात्री निर्माण झाले.त्याने मराठी साहित्याची ग्रामीण, दलित, स्त्रीवादी अशी वेगवेगळी दालने निर्माण झाली.समृध्द होवू झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य विषय विचारधारा ही त्यांच्या स्वतंत्र जीवनदृष्टीची तसेच वाङ्.मयीन दृष्टीची आहे. सौंदर्यवादी, मानवतावादी, क्रांतिकारी आणि ऐतिहासिक आहे.

1960 नंतर मराठी साहित्य ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी या प्रवाहामुळे अधिक समृध्द झाले. मराठी साहित्य समाजाभिमुख आणि गतिमान झाले. त्यामध्ये दलित साहित्य हे आशय अभिव्यक्तीने विभिन्न ठरले. विशेषतः या साहित्याला आचार, विचार, जीवनदर्षन, तत्वज्ञान, अभिव्यक्ती, भाषा पध्दती इत्यादि भिन्नतेने वेगळेपणा प्राप्त झाला.बाबासाहेब आंबेडकर ही दलित साहित्याची मुख्य प्रेरणा आहे. आंबेडकरांच्या सामाजिक, सांस्कृतिक विचारांचा भक्कम पाया लाभला होता.या निमित्ताने मराठी साहित्यामध्ये परिवर्तन -विद्रोह -क्रांती या मूल्यांचा उद्घोष झाला. जीवनमूल्यांना वाङ्.मयीनमूल्ये म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. मानवता, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये साहित्यांतून मांडली जावू लागली. कला जाणीव वृध्दिंगत झाली आणि दर्जेदार साहित्याची निर्मिती झाली. आंबेडकरी चळवळीतुन अनेक आंबेडकरवादी प्रतिभावंत पुढे आले आणि त्यांनी कविता, कथा, स्वकथन, कादंबरी, नाटक व वैचारिक लेखनातुन आपला हुंकार व्यक्त करू लागले. वेदना, विद्रोह, नकाराची जोरकस अभिव्यक्ती प्राप्त झाली.

मराठी साहित्यामध्ये दलित भावनषिलतेचा प्रथमतः आविष्कार कवितेमध्ये झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित चळवळीतुन वेदना, विद्रोह, नकार घेवून दलित साहित्य जन्माला आले ते प्रथमतः कवितेच्या माध्यमातुन उदयास आले. बहिष्कृत मानवाच्या माणूसकीच्या संवेदनांची विविध भावरूपे व्यक्त करणारी दलित कविता तळागाळातील जातीमुळे भरडलेल्या माणसाच्या जीवनातील चिरडलेली वेदना जिवंत करून त्याच्यामध्ये आत्मसन्मानाची ज्योत जागृत करणे.त्याला एकत्र करून मानव मुक्तीचा लढा उभा करणे. लोकशाही जीवनमूल्ये रूजविणे आणि समताधिष्ठित नवसमाजाची निर्मिती करणे हा तिचा विशेष बनला.कविता अन्याय,अत्याचार,शोषण विरोधात मानवतेचा आवाज देऊ लागली.

नामदेव ढसाळांचा 'गोलपीठा' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आणि मराठीत दाहक दलित जीवनानुभव व्यक्त झाला.त्यांनतर सशक्त आणि समर्थ दलित कविंची पिढी उदयास आली. मराठी कवितेला एक नवा सामाजिक जाणिवांचा चेहरा प्राप्त झाला. नामदेव ढसाळ आणि बाबुराव बागुल हे मराठीतील पहिल्या दलित कवितेचे, पिढीचे शिलेदार आहेत.दलित कवितेने प्रामुख्याने आक्रमकपणे सामाजिक, आर्थिक, धार्मिक शोषणाविरूध्द आवाज दिला. क्रांतिची हाक दिली व परिवर्तनाचा ध्यास घेतला. मानवमुक्तीचे स्वप्न दाखविले. दुःख,वेदना, विद्रोहाने बंड केले.समतेची मूल्ये दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे भक्कम असे वैचारिक अधिष्ठान प्राप्त झाल्याने तसेच जीवनमूल्ये व वाङ्.मय मूल्यांमुळे मराठी कवितेचे क्षितिज विस्तारण्यात दलित कविता यशस्वी ठरली आहे.

मराठीत दलित कथा रूपाने अत्यंत कला संपन्न लेखन झाले आहे. आशय आणि अभिव्यक्तीचे विविध आयाम प्राप्त झाले आहे. उपेक्षित, वंचित दलितांच्या शोषित जीवनाच्या समाजनाटयांचे वास्तव चित्रण केले आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधु मानव, बाबुराव बागुल, वामन होवाळ, योगिराज वाघमारे, अविनाश डोळस, उर्मिला पवार, केशव मेश्राम, वासुदेव डहाके, शरणकुमार लिंबाळे या कथाकार गावगाडयासह जगाचा पटलच डोळयांसमोर उभे केला आहे. मराठीत अनुभवविश्वाची कथा जिथे संपते तिथून पुढील प्रवास बाबुराव बागुलांची कथा करते. सर्व दलित कथा गावगाडयातील नाना माणसे, नाना जमाती, त्यांच्या अंधश्रध्दा त्यांचे दुःख,दैन्य, दारिद्रय, गरीबी श्रीमंती, पोटाची, मनाची आणि शरीराची भूक, मानवी संबंधाची गुंतागुंत स्त्रियांवरचे अत्याचार,जाती वर्णाची गुलामगिरी त्यांच्या व्यथा असे उपेक्षितांचे अनेक मुखवटे अंतर्बाहयपणे चित्रित केले आहे.मानव मुक्ती लढा यशस्वीतेसाठी जातीअंतीच्या लढयाचे आवश्यकता व्यक्त केली आहे. दलित कथा प्रवाहांने आंबेडकरी विचार सामान्यापर्यंत पोहोचविले.

दलित कादंबरी संख्येने मर्यादित असली तरी डॉ.बाबासाहेबाच्या जीवन आणि कार्याने ती प्रभावित आहे.म्हणूनच मराठी कादंबरीमध्ये तिला आगळेवेगळे स्थान आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हिच तिची प्रेरणा आहे. त्यांच्या समानता, बंधुभाव, न्याय या विचारांचे मराठी कादंबरीला कोंदण प्राप्त झाले. त्यामुळे ही जीवनमूल्यांने तसेच वाड्.मयीन गुणांने संपन्न आहे.दाहक जीवनानुभवी आविष्कार तसेच मानवमुक्तीच्या लढयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.मराठीत अण्णाभाऊ साठे, शकरराव खरात, बाबुराव बागुल, यशवंत महानोर, माधव कोंडविलकर, बाबुराव गायकवाड, योगेंद्र मेश्राम, लक्ष्मण गायकवाड, शरणकुमार लिंबाळे यांनी दलित कादंबरीचे दालन समृध्द केले आहे. नेमक्या आणि मोजक्याच कादंबरीनी संपूर्ण दलित जीवन कवेत घेतले आहे.त्यांच्या कांदबरीचे विषय बुध्द आणि आंबेडकर आहेत.दलित चळवळीत सर्वसामान्यांची होणारी कोंडी तसेच प्रामाणिक माणसाला होणा-या यातना यांचे चित्रण आहे.आंबेडकरी चळवळीने सामान्य माणसांमध्ये जागृती घडवून आणली.

आत्मकथन हा केवळ मराठी दलित साहित्यतीलच नव्हे तर भारतीय साहित्यातील अतिशय महत्वाचा वाड्मयीन आविष्कार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' या विचारधनातुन नव सुशिक्षित दलित वर्गाला आत्मभान आले. त्यांना स्वतःच्या हक्कासाठी मानवमुक्तीचा लढा हेच सामाजिक क्रांतिचे व समाज परिवर्तनाचे अस्त्र आणि शस्त्र आहे.अशी तमाम उपेक्षित वंचित शोषितांना जागे व्हा ची हाक दिली.त्या आत्मभानातुन उदयास आलेला वाड्.मय प्रकार म्हणजे स्वकथन होय. आत्मकथनांनी भारतीय समाजजीवनातील भीषण वास्तवता प्रथमच निर्भिडपणे मांडली. समाजातील शोषणाखाली भरडलेल्या व्यक्तींनी स्वतःचे जगणे अतिशय मोकळेपणाने कथन केले.त्यांने मराठी साहित्याचा चेहरा मोहरा बदलुन गेला.आत्मकथने केवळ वाड्.मय प्रकार न राहता समाजशास्त्रीय अभ्यासाची साधने झालीत.समाजभाषा अभ्यासामध्ये इतकी त्यांची प्रस्तुततः वाढली आहे.

प्रामुख्याने प्र.ई.सोनकांबळे, दया पवार, माधव कांडविलकर, रुस्तुम अचलखांब, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, दादासाहेब गोरे, गौतम कांबळे, नरेंद्र जाधव यांच्या निवडक दलित आत्मकथनांनी नवे अनुभवविविश्व मराठीत साकार केले आहे.त्याद्वारे उपेक्षित मराठी माणसांचे विशाल जग प्रकट झाले.या आत्मकथनांनी व्यक्तीला प्रथम आत्म आणि नंतर समाजचिंतनाची विचारी दृष्टी दिली.डॉ.बाबासाहेबांची आत्मसन्मान हे तत्व कारणीभूत होते.

मराठीत 1955 साली म.भि.चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे रंगभुमीवरील पहिले दलित नाटक प्रसिध्द झाले.नागपूरच्या दीक्षाभूमीवर या नाटकाचा सहा लाख प्रेक्षकांसमोर प्रयोग झाला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळींसोबत जलसा विकसित झाला.आंबेडकरी चळवळीचा प्रसार करणेसाठी म्हणून जलसा प्रकार मराठीत अस्तित्वात रूढ झाला. नंतर सामान्य माणूस आणि त्याचे जीवन हेच या नाटकाचा विषय नायक झाला.त्यापूर्वी मराठी साहित्यात तो कधी झालाच नाही.परंतु एक वास्तव जीवनानुभवी नाटयात्म आविष्कारानी दलित नाटकांने नवा इतिहास रचला.मराठीत दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, रूस्तुम आचलखांब, संजय पवार, योगिराज वाघमारे, अविनाश डोळस इत्यादीनी कलात्मक प्रयोगी नाटके लिहिली आहे. लोकशिक्षण, आंबेडकरी विचार, संस्कृती संस्कार, लोकशाही जीवनमूल्यांची पुर्नस्थापना, समाज जीवनातील अस्पृश्यता, जातीवाद, विषमता, दारिद्रय या सगळया गोष्टींची एकत्र गुंफून करून दलितांच्या दुःखाची ही नाटके विशेषत्वाने वेध घेणारी आहेत.

मराठी साहित्यातील दलित वैचारिक निबंध हा वाड्.मय प्रकार खास करून डॉ.बाबासाहेब आंडेकरांच्या तत्वज्ञान तसेच विचारमंथनातुन उदयास आलेला आहे. 'सामाजिक लोकशाहीचे प्रणेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथात म.भि.चिटणीस नंतर डॉ.म.ना.वानखेडे यांनी 'दलितांचे विद्रोही वाड्.मय' या ग्रंथातून वैचारिक व वाड्.मयीन निबंध लेखन केले.शंकरराव खरात यांनी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर','अस्पृश्याचा मुक्तिसंग्राम' या सारख्या ग्रंथाद्वारे वैचारिक निबंध लेखन केले आहे.दीनबंधू शेगावकर, नरेंद्र जाधव, डॉ.भालचंद्र मुणगेकर, वसंत मून, डॉ.रावसाहेब कसबे, प्रा.अरूण कांबळे, डॉ.प्रकाश खरात, डॉ.यशवंत मनोहर इत्यादीं निबंधकारांनी निबंध वाड्.मयाद्वारे आंबेडकरांच्या विचारांची प्रस्तुतता विशद केली आहे.धर्मांधता आणि त्यांचे समाज व लोक जीवनावर होणारे परिणाम याबद्दलची मीमांसा या निबंधात आहे.

**समारोप**

मराठीतील दलित साहित्याची डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यक्तीविचार आणि जीवनकार्य हीच मुख्य प्रेरणा आहे. दलित साहित्याच्या रूपाने मराठी साहित्याला नवी परिमाणे प्राप्त झाली.त्यामुळे दलित साहित्याची भारतीय साहित्यशास्त्रातील ऐतिहासिक नोंद आहे. या साहित्याचे व्यापक पातळीवरून शोषित पिडीतांच्या आयुष्याचे चित्रण केले. सामाजिक व आर्थिक प्रश्नाना महत्व दिले.वास्तवाविरूध्द वेदना, विद्रोह व नकाराची दृष्टी पेरली. या साहित्याने मानवतावाद शिकविला आणि रूजविला. अनुभव समृध्दीने साहित्याला समाजाभिमुख केले. विज्ञाननिष्ठ भौतिक विचाराला प्राधान्य दिले. मानवतावादी मूल्ये साहित्यांत रूजविली. दलित साहित्याला वाड्.मय प्रेमींच्याही अभिरूचीचा विषय बनविले.प्रस्थापित मराठी साहित्य मूल्यांना धक्का देणारी वेदना, विद्रोह, नकारी भावनेतुन दलित साहित्य चळवळ उभी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा वारसा स्वीकारून दलित साहित्य प्रवाह उदयास आला.आंबेडकरांची साहित्यदृष्टी ही आधुनिक भारतीय साहित्यशास्त्राची मूलतत्वे म्हणून दलित साहित्याने स्वीकारली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्य संपदेला मराठीचे कोंदण प्राप्त झाले आहे.

**निष्कर्ष:**

१.सामाजिक चळवळी या वाड्.मयीन चळवळीत रूपांतरित झाली.

२.ग्रामीण, स्त्रीवादी तसेच दलित चळवळींना साहित्य स्वरूप प्राप्त झाले.

३.डॉ.बाबासाहेबांच्या समताधिष्ठित नवसमाज निर्माण कार्याला साहित्याचे आधिष्ठान प्राप्त झाले.

४.विचारांची प्रस्तुतता वाढते तेव्हा त्या विचारधारेला सार्वत्रिक स्वरूप प्राप्त होते.

५.डॉ.आंबेडकरांच्या विचारसौंदर्य आणि जीवनकार्याने मराठी साहित्याला कोंदण मिळाले.

६.दलित साहित्यामुळे मराठी साहित्याला नवचैतन्य प्राप्त झाले.

**संदर्भ :**

१.मनोहर यशवंत:दलित साहित्य सिध्दांत आणि स्वरूप, औरंगाबाद 1978

२.फडके भालचंद्र:दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, विद्या प्रकाशन, कोल्हापूर.1989

३.मेश्राम योगेंद्र:दलित साहित्य उद्गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर.1998

४.कीर धनंजय:डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र,पाप्युलर प्रकाशन मुंबई.1966

५.खैरमाडे चां.भ.:डॉ.भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड 5 ते 11

६.बागुल बाबुराव:दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान, बुध्दिस्ट पब्लिशिग हाउस नागपूर.1981